भारतासमोरची आव्हाने

राज्यसभेतील विरोधी नेते श्री अरुण जेटली यांनी मुंबई युनिवर्सिटीच्या के.सी.कॉलेज मध्ये के.एम.कुंदन मेमोरियल व्याख्यानमाले अंतर्गत दिलेल्या वक्तव्याचा काही अंश प्रस्तुत आहे.

आपण सध्या आशावाद आणि निराशावादाच्या युगात जीवन जगत आहोत. आपल्या आसपास मन खिन्न होईल असे वातावरण असल्याने जनतेत निराशाचे वातावरण पसरले आहे. तथापि भारत आशेचा किरण दाखवताना निराशावादाबरोबर आशावाद पण दिसत दाखवत आहे.

आपल्या देशाची 60 टक्के वसाहत ही उपजिवीकेसाठी कृषि क्षेत्रावर अवलंबून आहे. एकूण राष्ट्रीय उत्पन्न(जीडीपी)त कृषि हिस्सा फक्त 16 टक्के आहे. दुसरीकडे सर्विस क्षेत्राचा हिस्सा हा 60 टक्के आहे. सर्विस क्षेत्रचा विकासामागचे कारण हे आहे की, हे क्षेत्र सरकारी नीति वर आधारित नाही किंवा त्यात पायाभूत सुविधाची सवलत दुबळी नाही आहे. कृषिक्षेत्रात कमी रोजगाराची समस्या हे आपल्यासमोरचे एक महत्त्वाचे आव्हान आहे. त्याकरिता मोठ्या संख्येत लोक कृषिक्षेत्रातून सर्विसक्षेत्रात स्थलांतर करत आहेत.

राजकारणातील गुणवत्ता

संसदीय लोकशाहीत राजकारण देशातील जीवनावर परिणाम करते. राजकारण नीति घडते. नीति पासून भारताच्या भावी दिशा ठरवली जाते. ज्यामुळे राजकारणात सुशासन येईल असे गुणवत्तेनुसार लोक जरुरी असतात. कुशासनामुळे भारताचा जीडीपी 9 टक्के झाला तर सुशासन येईल तर भारताचे किती जबरदस्त परिवर्तन होईल हे स्वाभाविक आहे.

गेल्या दोन दशकात भारताच्या राजकीय पक्षाची पायाभुत सुविधेचे पतन झाले आहे. मोठ्या राजकीय पक्षांत नेत्यांच्या परिवारवाल्यांची भाउगर्दी दिसून येते.

काही पक्ष नात्यागोत्यांचा आधार घेताना दिसून येतात. अनेक पक्षांत कधी कधी अंतर्गत लोकशाही बघायला मिळते. पक्षात देखील अनुवांशिकतेप्रमाणे वंशालाच स्थान मिळते. जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या आपल्याकडे गुणवत्तेपेक्षा वारसागत राजकारण वाढत चालल्याचे दिसून येते. त्यामुळे राजकारणात गुणवत्ता घटत चालली आहे. ओळखीच्या आधारे राजकारणात प्रवेश मिळत आहे. ठोस नीतिवादा ऐवजी नात्यागोत्यांना प्राधान्य दिले जात आहे. भारतीय मध्यम वर्गाचा विस्तार वाढत आहे तसे तसे जनतेच्या अपेक्षा पण वाढत आहेत. फक्त जनमत राजकारणाची दिशा बदलू शकते. नाती-गोतीच्या आधाराखालील राजकारणाऐवजी कार्यक्षमता आणि ईमानदारीला प्राधान्य देण्याला भारतीय लोकशाहीची खरी ताकद आहे. असे असेल तरच प्रशासनीक गुणवत्ता सुधारु शकेल.

पॉलिसी चा पक्षाघात आणि गरिबी निर्मुलन

सुशासनाकरिता मजबुत नेतेगीरी आवश्यक आहे. त्याकरिता नीति घडवण्यासाठी निर्णायक नेतृत्व पाहिजे. भारताची अर्थव्यवस्था सध्या व्यापक सर्वसंमती च्या ट्रेंड वर चालली आहे.

येत्या दहा वर्षात किंवा त्यापुढील काळात 9 टक्के विकासदर टिकवून ठेवला पाहीजे. तरच गुंतवणूकीचे लक्ष साकार होईल आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होईल. तसेच महसूलाचा उपयोग पायाभूत सुविधा आणि सामाजिक सुविधा वाढवण्याकडे केला जाऊ शकतो. याबरोबरच गरिबी निर्मुलनाच्या योजनेत वाढ होईल आणि सामाजिक उत्कर्ष तसेच प्रॉपर्टी निर्माण होईल अशी व्यवस्था करणे गरजेचे आहे.

मागासवर्गाचा उत्कर्ष खास करुन दलित कल्याण, आरोग्य, शिक्षण आणि ग्रामीण पायाभुत सुविधांकडे अधिक भर द्यावा लागेल. आपल्यासमोर हि सर्व आव्हाने आहेत. 9 टक्के विकास दरापर्यंत कशा प्रकारे पोचणार?

भारताला 9 टक्के विकासदरापर्यंत पोचण्यासाठी निर्णायक नीति घडवली पाहिजे. आपल्याला पायाभुत सुविधेत त्वरित सुधारणा केली पाहिजे. दुर्देवाने आपले टेलिकॉम तसेच राष्ट्रीय महामार्ग क्षेत्र भ्रष्टाचाराने माखले आहे. जंगी गुंतवणूक मिळवण्यासाठी पर्यावरणाच्या रक्षणाच्या नावे लायसन्सराज योग्य नाही.

अर्थव्यवस्था आणि पर्यावरणाचा एकत्र विकास झाला पाहिजे. उत्पादनक्षेत्रात सुधारणेला वेग दिला पाहिजे. ग्राहकांचा स्वस्त दरातील चीजवस्तु खरिदी करण्याचा आग्रह असतो, अशा युगात आपल्याला जगायचय. ज्यामुळे कमी खर्चातील उत्पादन ही यशाची किल्ली आहे. व्याजदर, पायाभुत सुधारणा, ऊर्जाक्षेत्रात सुधारणांचा परिणामकारक अंमल आणि आंतरराष्ट्रीय स्तर तुलनात्मक रित्या वापरण्या बाबत उपलब्ध करण्यासाठी उपाययोजना जरुरी आहेत.

आपल्याला महामार्ग, बंदरे, एअरपोर्ट, ग्रामीण मार्गाच्या विकासावर भर दिला पाहिजे. भारत पर्यटनक्षेत्राच्या क्षमतेचा पूरेपूर उपयोग करण्यात निष्फळ ठरला आहे. त्यात फेरफार करणे गरजेचे आहे. शैक्षणिक पायाभुत सुविधा, माहिती टेक्नॉलॉजी, टेलिकॉम, फार्मसी क्षेत्र, ऑटोमोबाईल क्षेत्र, महामार्ग वगैरेंचे विस्तारिकरण तसेच शहरी गृहनिर्माणक्षेत्रात वर्षभरात जी प्रगती झाली, तिला वेगवान बनावण्यासाठी नवी नीति आणि नवा कायदा आणला पाहिजे.

युतीची सरकारे

महान नेते आणि संपूर्ण बहुमत मिळण्याचा जमाना आता राहिलेला नाही. भारताचा

राजकीय अजेंडाच बदलला गेला आहे. स्वातंत्र्यानंतरच्या वर्षात देशात एकता आणि अखंडते बाबत चिंता भेडसावत होती. ती कमी होउन आता आर्थिक विकास, गरिबी निर्मुलन आणि प्रादेशिक अपेक्षा चिंतेचे कारण ठरली आहे. केंद्रात पण प्रादेशिक पक्षांच्या सहभागाने सरकार चालते. लोकसभेत युतीचे युग आले आहे. अशा परिस्थितीत प्रादेशिक पक्षाने राष्ट्रिय विचारसरणी अंगीकारली तरच सुशासन येईल.

भ्रष्टाचार

भ्रष्टाचार आपल्या प्रशासनीक संबंधी व्यवस्थेला खात आहे.

टेलिकॉम आणि राष्ट्रिय महामार्गाच्या सफलतेवर भ्रष्टाचारामुळे फार मोठा फरक पडला आहे. कोळसा खाण वितरणात झालेल्या भ्रष्टाचारामुळे ऊर्जाक्षेत्रात भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे. जमीनीचा सौदा, रिअल इस्टेटचा सौदा, नैसर्गिक संसाधनांचे वाटप, खाण, दारु, खासगी क्षेत्रातील शिक्षण वगैरेत भ्रष्टाचार बोकाळला आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या 65 वर्षानंतर पण राजकीय भांडार पूरेशा प्रमाणात दिसत नाही आहे. लोकपालासाठी नुकतीच झालेली चर्चा आणि भ्रष्टाचार-विरोधी कडक कायदा आणणे आवश्यक बनले आहे. सीबीआयचे कामकाज निष्पक्ष आणि दखलरहित करणे गरजेचे आहे. लोकपालात धर्म आधारित आरक्षण झाले नाही पाहिजे.

चांगल्या समाजाचे निर्माण

धर्म आणि नाती-गोतीचा भेदभावाच्या आधारे उभ्या राहिलेली समस्या दूर करण्याची गरज आहे. यासाठी सतत चर्चा करणे गरजेचे आहे. विविध समाजाप्रती सद्भाव स्थापित झाला पाहिजे आणि चांगल्या समाजाचे निर्माण होण्याकरिता त्या दिशेने पावले उचलण्याची गरज आहे. नुकतेच राष्ट्रिय राजधानीत झालेला सामुहिक बलात्काराने हाहाकार माजवला. महिला अशा शोषणाचा भोग बनत आहेत. नारी

संस्काराच्या दृष्टिने भारत निष्फळ बनत आहे.

अनुसूचित जाती आणि जमातीतील लोक अजूनही मागे आहेत. त्यांना समान अधिकार देणे गरजेचे आहे. आरक्षणामुळे त्यांची गरिबी आणि अन्याय दूर केला पाहिजे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याबाबत असहिष्णुता वाढत आहे.

दहशतवाद आणि घुसखोरी

सीमेपलिकडून होत असलेला आतंकवाद आणि घुसखोरीचा भारत लक्ष ठरत आहे. देशाच्या फाळणी नंतर काश्मीर हे पाकिस्तानचा कधीच न संपणारा अजेंडा बनून गेला आहे. गेल्या दोन दशकापासून दहशतवादाच्या नावाखाली परंपरागत युद्ध आणि घुसखोरी वाढली आहे. गेल्या कित्येक वर्षात आपल्या देशातील तत्त्व त्यांच्या हातातले बनले आहे.

पाकिस्तानला आता वाटू लागले आहे की, भौगोलिक सीमा पुन्हा एकदा बदली होऊ शकत नाही. त्यामुळे पाकिस्तानात राहणा-या इसमांकडून भारतीय संसदेवर हल्ला करण्यात आला, मुंबईत अतिरेकी हल्ला करण्यात आला. पाकिस्तानी सैन्य, आयएसआय, सरकार आणि दहशतवादी गूटाकडून एकच लक्ष ठेवण्यात आले आहे. पाकिस्तान दहशतवादाला प्रोत्साहन देणे बंद करिल तरच त्याच्या बरोबर गंभीर संबंध ठेवण्याचा विचार केला गेला पाहिजे.

लोकसंख्या हीच संसाधन

भारत हा तरुणाईचा देश आहे. विकसित देशांकडे लोकांची संख्या कमी असते. त्यांची अर्थव्यवस्था ही कमी होत असलेल्या लोकसंख्येमागे धावत नसते. तर भारतात मध्यम वर्ग आणि महत्त्वाकांक्षी वर्ग वाढत आहे त्यामुळे शिक्षणाचा विस्तार तसेच मानवी संसाधनांचा विस्तार होत आहे. आपण अतिरिक्त मानवी मनाचा विकास आणि

विस्तार करत आहोत. विकसित देशाला पण असे करणे गरजेचे आहे. वाढत्या लोकसंख्येला अर्थव्यवस्थेच्या कामी आणणे आपल्याला गरजेचे आहे. विकसित देश आणि भारतामधील जनसांख्यिकीचा फरक यात भारत सक्षम बनेल.

भारताची क्षमता

भारतीय संस्कृति, आपला ऐतिहासिक वारसा, आपली जनता, विदेशात स्थायिक झालेला भारतीय, खेळ, संगीत, सिनेमा, साहित्य वगैरे क्षेत्रातील क्षमतेला तोड नाही. मला याबाबत कोणतीच शंका नाही की, निराशावादा दरम्यान पण आपला देश प्रगति पथावर आगेकूच करील आणि आशेचा किरण दाखवेल.